"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


| | | |
|---|---|---|
| कार्यालय फोन | : | २३८७ ७३०१, २३८८ ००७३ |
| WEB SITE | : | http://welcome.to/nkgsb |
| E-MAIL | : | nkgsbs@gmail.com |
| कार्यालयीन वेळ | : | दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५) |


।। इदं च नास्ति परं च न लभ्यते ।।

मूल्य रु. ५/-

| | | |
|---|---|---|
| क्रमांक ३ | वर्ष : ३३ | ऑक्टोबर-डिसेंबर २०१२ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspapers of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004.

**दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ आणि**

**दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी**

## वार्षिक स्नेहसंमेलन २०१२

### निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

**प्रमुख पाहुणे** : श्री. किशोर दिगंबर कुलकर्णी, आपल्या बँकेचे अध्यक्ष

**स्थळ** : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर.

**दिनांक व वेळ** : रविवार २ डिसेंबर २०१२ सायं. ४.१५ वाजता.

### कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- मध्यंतर
- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार
- कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना सौ. सीमा किशोर कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**प्रेमानंद शं. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – एज्युकेशन सोसायटी

## संपादकीय

### आगामी स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे श्री किशोर कुलकर्णी

आपल्या ज्ञातीतर्फे प्रतिवर्षी स्नेहसंमेलन होत असते. यंदाच्या स्नेहसंमेलनाचे आमंत्रण समोरील पृष्ठावर छापलेलेच आहे. या संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून आपल्या बँकेचे विद्यमान अध्यक्ष श्री किशोर कुलकर्णी यांना निमंत्रित करण्यांत आलेले आहे. बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या या प्रमुख पाहुण्यांचा हा अल्पसा परिचय.

श्री कुलकर्णी यांचा जन्म १७ मे १९४२ साली मुंबई येथे झाला. १९४४ साली त्यांचे कुटुंब कारवारला स्थायिक झाले. त्यांचे वडील श्री दिगंबर कुलकर्णी हे सामाजिक कार्यकर्ते व वकील म्हणून कारवारला प्रसिद्ध होते. कारवारहून प्रसिद्ध होणाऱ्या 'विचारी' या नियतकालिकाचे ते काही वर्षे संपादक होते. 'कारवार-बेळगांव सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' ही चळवळ त्यावेळी जोरात चालू होती. त्या चळवळीचे नेतृत्व त्यांनी उत्कृष्टपणे सांभाळले. श्री किशोर कुलकर्णी यांचे शालेय शिक्षण हिंदू हायस्कूल कारवार येथे झाले. नंतर पुढील शिक्षणासाठी १९५९ साली ते मुंबईला आले. ते B.com (Hons), L.L.B., A.I.C.W.A. इत्यादी पदव्यांनी विभूषीत आहेत.

फेब्रुवारी २०१२ मध्ये आपल्या बँकेचे नूतन संचालक मंडळ निवडून आले. त्या मंडळाच्या पहिल्या सभेत श्री कुलकर्णी यांची बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली. ते २००० सालापासून बँकेच्या संचालक पदावर कार्यरत आहेत. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत ते उपाध्यक्ष होते. ते पूर्वी रिलायन्स एनर्जी या उद्योगसमूहाच्या एच.आर.डी. व फायनान्स विभागाचे संचालक म्हणून काम करीत होते १९६५-७० च्या दरम्यान त्यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारी मंडळात खजिनदार म्हणून काम केले. व्यवसायाच्या निमित्ताने त्यांनी भारतात व जगभर अनेक दौरे केले. अकाउन्ट्स आणि फायनान्स, टॅक्सेशन क्षेत्रात त्यांचा अनुभव दांडगा आहे. वर्ल्ड बँक व IFC (वॉशिंग्टन) सारख्या कंपन्यांमध्ये त्यांनी उत्तम कामगिरी बजावलेली आहे.

कैवल्यपूर मठांत ते सक्रिय आहेत. गेल्या वर्षी त्यांचा आपल्या स्वामीजींकडून सत्कारही झाला. किशोरच्या या यशस्वी वाटचालीत त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सीमाचा मोठा वाटा आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्रीअसते असं म्हणतात. ते सीमावरुन मनोमन पटते. दोघांच्याही परिश्रमाला खरोखरच सीमा नाही. विशेष उल्लेख करण्यासारखे म्हणजे २०१७ साली आपल्या बँकेला शंभर वर्षे पूर्ण होतील. श्री कुलकर्णी यांच्या अध्यक्षपदाचा कालावधी तोपर्यंत आहेच. १९१७ साली बँक स्थापन झाली तेव्हा बँकेचे पहिले अध्यक्ष शेठ शांताराम हे हळगेचे कुलकर्णी होते. शंभराव्या वर्षांचे अध्यक्ष सुद्धा हळगेचेच किशोर कुलकर्णी असतील हा एक विलक्षण योगायोग म्हणायला पाहिजे.

**सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे**
**(अतिथी संपादक)**



## वार्षिक कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेचे विजेते

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही २६ ऑगस्ट २०१२ रोजी विद्यार्थ्यांसाठी संस्कृत पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या सुरुवातीला संघाचे कार्यवाह श्री परेश बर्डे यांनी स्पर्धेचे उद्दिष्ट व पाठांतरासाठी गुण देण्याचे निकष विशद करुन सांगितले. त्या पश्चात मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात नमूद केल्याप्रमाणे शिशु व कुमार गटांतल्या स्पर्धकांचे श्लोकपठण झाले. मध्यंतरानंतर सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या. निकाल जाहीर करण्यापूर्वी परीक्षकांतर्फे श्रीमती स्वाती सहस्रबुद्धे यांनी स्पर्धकांना योग्य ते मार्गदर्शन केले. श्री सुभाष कसबेकर यांनी स्पर्धेचे उत्कृष्टपणे सूत्र संचालन केले.

### विजेत्यांची नावे

| | |
|---|---|
| **शिशुगट (६ वर्षाखालील)** | १. ऋषिका सत्यार्थ देसाई, अंधेरी * |
| | २. निकिता अमीत पाटकर, माहीम |
| | ३. आर्या रवीन्द्र वर्टी, पारले |
| **शिशुगट (इयत्ता ४थी पर्यंत)** | १. वेदा बाळकृष्ण पालेकर, कांदिवली * |
| | २. अमेय उल्हास नेत्रावळी, पारले |
| | ३. शुभन सचिन तेलंग, गावदेवी |
| **कुमार गट (इ. ५वी ते १०वी)** | १. अमेय मंदार पंडित, पारले ** |
| | २. नंदिनी नीलेश वागळे, अंधेरी |
| | ३. सिद्धांत अजय दिवेकर, दादर |
| **विशेष पारितोषिक –** | ओजस प्रसन्न फेणे, जोगेश्वरी |

* दिनकर लक्ष्मण कुलकर्णी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेली पारितोषिके ऋषिका व वेदा या विजेत्यांना मिळाली.
** आनंद गणपती वर्टी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेले पारितोषिक अमेय या विजेत्यास मिळाले.

**PERFECT PEST CONTROL**
**Government Licence Holder**
**Relief from all kind of pests**
For Service Contact :
**Deepak Nadkarni (9869058481)**
**Off.:** Bldg. No. 99, Anandvan C.H.S., Near Hanuman Mandir, Samata Nagar, Kandivali (E), Mumbai - 400 101. • **Tel.:** 2884 2981 • **E-mail :** ppcmumbai@yahoo.in

## प्रकाशझोत

### ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ श्री मोहन दिवेकर यांचा डेक्कन शुगर असोसिएशनतर्फे 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मान

कारवार येथे जुन्या पिढींतील सर्वांना परिचित असलेले गव्हर्मेन्ट हायस्कूलचे मुख्याध्यापक कै. दिवेकर मास्तर यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री मोहन दिवेकर हे पुण्याला स्थायिक झालेले आहेत. पुण्याच्या सुप्रसिद्ध शेतकी महाविद्यालयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. (MSc (Agri)) शेती विषयांत प्रावीण्य मिळवून ऊस संशोधन व विकास या क्षेत्रांत १९५० सालापासून ते कार्यरत आहेत. ते ८५ वर्षांचे असले तरी अजूनही त्यांच्या अनुभवाचा फायदा देशांतच नव्हे तर परदेशांतही घेतला जातो. सुमारे आठ वर्षांपूर्वी इथियोपिया येथे साखर कारखाना उभारणीच्या प्रकल्पात भारतातून काही तज्ज्ञ गेले होते. तेव्हा श्री दिवेकर हेही गेले होते. काही वर्षांपूर्वी गोव्यातील पहिला साखर कारखाना उभारण्याची जबाबदारी त्यांच्यावरच सोपविण्यांत आली होती. महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांच्या संचालक पदावर त्यांनी काम केलेले आहे. त्यांच्या कार्याची व योगदानाची दखल घेऊन डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनतर्फे १४ जुलै २०१२ रोजी कोल्हापूर येथे तेथील संमेलनात त्यांना 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यांत आला.

### स्वातंत्र्यदिनी श्री नागेश वाघ यांचा गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल पालीस पदकाने सन्मान

गेल्या स्वातंत्र्यदिनी महाराष्ट्राच्या पोलीस दलांतील चाळीस अधिकाऱ्यांना गुणवत्ता सेवेबद्दल 'पोलीस पदक' जाहीर करण्यांत आले. त्यांत माहीम येथील शांतीनगरचे रहिवासी श्री नागेश गुरुप्रसाद वाघ यांचा समावेश आहे. श्री वाघ हे राज्यगुप्तवार्ता विभाग या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या खात्यांत साहाय्यक आयुक्त या अतिमहत्वाच्या पदावर आहेत.

आपल्या आत्तापर्यंतच्या २९ वर्षाच्या सेवेत त्यांनी बृहन्मुंबई पोलीस दलात पोलीस स्टेशन, इमिग्रेशन, वाहतुक नियंत्रण, सुरक्षा व विशेष शाखा या विभागात उत्तमरीतीने कामगिरी बजावली आहे. गेल्या सुमारे १९ वर्षांपासून ते राज्य गुप्तवार्ता विभाग, मुख्यालय, मुंबई येथे कार्यरत असून गुप्त माहितीचे संकलन, विश्लेषण, मुल्यमापन, छुप्या कारवायांचे नियोजन देशातील इतर गुप्तचर यंत्रणांशी समन्वय, महाराष्ट्र राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे अहवाल शासनास सादर करणे अशा अनेक कामांची जबाबदारी उत्कृष्ठरीत्या पार पाडित आहेत.

त्याचप्रमाणे नियमित जबाबदाऱ्या सांभाळून ते महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना महाराष्ट्र इन्टेलिजन्स अकॅडमी, पुणे येथे आपला सखोल अभ्यास व अनुभवाच्या आधारे दहशतवाद, नक्षलवाद, सुरक्षा या विषयांवर सातत्याने मार्गदर्शन करीत असतात. एक प्रामाणिक, तत्त्वनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ व त्याच बरोबरीने हसतमुख अधिकारी म्हणून सहकाऱ्यांमध्ये त्यांची ओळख आहे.



श्री वाघ यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेबद्दल यापूर्वी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे सन्मान चिन्ह (In-Signia) प्रदान करण्यात आले आहे. भारताच्या ६६व्या स्वातंत्र्यदिनी दिल्ली दरबारी त्यांच्या गुणवत्ता सेवेची दखल घेण्यात येऊन भारताचे राष्ट्रपति यांनी त्यांना प्रतिष्ठीत असे पोलीस पदक जाहीर करुन त्यांचा गौरव केला आहे.

कारवारचे भूषण असलेले विद्यावाचस्पती मंगेश रामकृष्ण तेलंग ऊर्फ सतार मंगेशमाम यांचे श्री वाघ हे पणतू होत.

### सौ. विद्या वागळे यांना पाककृतीबद्दल आणखी एक पुरस्कार

माहीम येथील सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे यांनी पाककृतीवर आत्तापर्यंत लिहिलेल्या चार पुस्तिकांचा परिचय वेळोवेळी मुखपत्रिकेच्या वाचकांना करुन दिलेलाच आहे. त्या पुस्तिका एवढ्या लोकप्रिय झाल्या की त्यांच्या अनेक आवृत्त्या काढाव्या लागल्या. पाककृती क्षेत्रांतील नैपुण्यांमुळे त्यांना अनेक स्पर्धांतून पारितोषिके मिळालेली आहेत. अलीकडेच त्यांत आणखी एका पुरस्काराची भर पडलेली आहे. लोकमत सखी मंच आणि आस्वाद हॉटेल यांच्या संयुक्त विद्यमाने भरविलेल्या 'आस्वाद २०१२' या स्पर्धेत त्यांच्या 'फ्रूट फज' या उपवासाच्या पाककृती बद्दल त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

### आपल्या बँकेला 'महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट नागरी सहकारी बँक' हा सलग दुसऱ्या वर्षी पुरस्कार

महाराष्ट्रांत सहकारी बँकांची 'महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन' ही एक शिखर संस्था आहे. ही संस्था गेली १७ वर्षे उत्तम कामगिराबद्दल सर्वोत्कृष्ट बँकांना पुरस्कार प्रदान करते. आपल्या बँकेला अनेक वेळा हे पुरस्कार मिळालेले आहेत. यंदा सहा विभागांतील सर्वांत वरच्या श्रेणीच्या म्हणजे शेड्युल्ड व मल्टीस्टेट वर्गांतून आपल्या बँकेला २०११-१२ वर्षांकरिता सर्वोत्कृष्ट नागरी सहकारी बँक म्हणून प्रतिष्ठेचा 'पद्मभूषण वसंतदादा पाटील पुरस्कार' मिळालेला आहे. गेल्या वर्षीही आपल्या बँकेला हा पुरस्कार मिळाला होता. आपल्या बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यक्षम परिश्रमामुळेच बँकेला हा सन्मान मिळालेला आहे.

### स्पृहणीय यश

**कौस्तुभ देसाई :** कारवार येथील संजीवनी नर्सिंग होमचे संचालक डॉ. सुहासिनी व डॉ. प्रदीप देसाई यांचा मुलगा डॉ. कौस्तुभ याने जुलै २०१२ मध्ये बंगळुर येथील सेंट जॉन्स मेडीकल कॉलेज येथून एमसीएच (प्लॅस्टीक सर्जरी) ही सुपर स्पेशॉलिटीची खडतर पदवी संपादन केली.

**नील वागळे :** माहीम येथील शांतीनगर सोसायटीत राहणारे सौ. किशोरी व श्री अजित विश्वनाथ वागळे यांचा नातू कु. नील भास्कर वागळे हा बालमोहन विद्यामंदिरचा विद्यार्थी. त्याने यंदाच्या शालांत

परीक्षेत सर्व विषयांत क्रीडा नैपुण्याबद्दल मिळालेल्या गुणांसह १०० पैकी १०० गुण मिळवून लक्षणीय यश संपादन केले व तो शाळेंतून पहिला आला. आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेत त्याने बालमोहनचे प्रतिनिधित्व केले. तसेंच टायक्वोंडोत ज्युनीयर गटांत त्याला राज्य पातळीमध्ये सुवर्णपदक मिळालेले आहे.

**ऋतुजा धुमें :** दादर येथील इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या मुंबईत व नवी मुंबईत सुमारे दीड डझन शाखा आहेत. या संस्थेच्या आंतरशालेय नाट्यछटा स्पर्धेत ठाणे येथे राहणारे श्री प्रभाकर काशिनाथ तेलंग यांची नात कु. ऋतुजा मंगेश धुमें हिने प्रथम क्रमांक पटकावला. ऋतुजा ही केवळ पाच वर्षांची असून ती दादर, ॲश लेनमधील शाळेंत के.जी. मध्ये शिकते. प्रख्यात अभिनेत्री स्मिता तळवळकर यांच्या अस्मिता चित्र अकॅडमी तर्फे बसविलेल्या दोन बाल नाट्यांतसुद्धा ऋतुजाने भूमिका केलेल्या आहेत.

**आकाश वर्टी :** मुलुंड येथील लेफ्ट. कर्नल (निवृत्त) विठ्ठल मारुती वर्टी यांचे चिरंजीव कॅप्टन अजित वर्टी हे सिंगापूर येथे मर्चंट नेव्हीच्या एका नामांकित कंपनीत वरीष्ठ पदावर कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा कु. आकाश हा दिल्लीच्या सीबीएससी बोर्डातून शालांत परीक्षेंत सिंगापूर येथून ९.८ ग्रेड (९३.६%) ही उत्तम श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाला. परीक्षेंत दुसरा आल्याबद्दल त्याला प्रतिष्ठित समजला जाणारा डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अकॅडमी पुरस्कृत रौप्य करंडक मिळाला. तो उत्तम क्रीडापटू असून क्रिकेट व फुटबॉल या खेळांत त्याने शाळेचे प्रतिनिधित्व केलेले आहे. तो गिटार व तबलाही छान वाजवितो.

**सिध्दान्त नाडकर्णी :** पुणे येथील श्री परेश मारुती नाडकर्णी यांचा बारा वर्षांचा नातू कु. सिध्दान्त संजय नाडकर्णी हा आकुर्डी, पुणे येथील सिटी प्राईड हायस्कूलमधला आठवीचा विद्यार्थी, गेल्या वर्षी Brain Cafe Science आणि Gakken Science Creation Institute, Japan या संस्थांतर्फे शालेय स्तरावर Budding Scientist Contest ही विज्ञान विषयांसंबंधी एक स्पर्धा आयोजित करण्यांत आली होती. त्यांत सिद्धान्तला UNIQUE SAIL BOAT या शोधाबद्दल द्वितीय क्रमांकाचे स्थान मिळाले.

## चुकीची दुरुस्ती

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात 'स्पृहणीय यश' या सदरांत **कु. विदुला पालेकर** हिला 'हिंदुस्थान टाईम्स' या दैनिकाने दिलेल्या शिष्यवृत्तीबद्दल तपशील दिला होता. त्यामध्ये विदुला ही डोंबिवलीच्या श्री मनोहर बाळकृष्ण पालेकर यांची नात असा चुकीचा उल्लेख आलेला आहे. वास्तविक ती चारकोपच्या श्री बाळकृष्ण दत्ताराम पालेकर यांची कन्या आहे.



# पुस्तक परिचय

## 'साद देती हिमशिखरे' : कुंदा देसाई

लोणावळा येथील प्रतिभावंत व लोकप्रिय साहित्यिका श्रीमती कुंदा रघुवीर देसाई यांनी लिहिलेल्या 'ऋणानुबंध' व 'पाऊलवाटा' या दोन कथासंग्रहाचे प्रकाशन झाले तेव्हां मुखपत्रिकेत त्यांचा उल्लेख आलेलाच आहे. नाशिक येथील 'वाङ्मय सेवा पुरस्कार' या स्पर्धेत 'पाऊलवाटा' या पुस्तकास उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचा पुरस्कार मिळाला होता. अलीकडेच त्यांचे 'साद देती हिमशिखरे' हे तिसरे पुस्तक प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक प्रवासवर्णनावर आधारित आहे. शिक्षिका असतांना त्यांना विद्यार्थ्यांबरोबर सहलीच्या निमित्त प्रवास करण्याची संधी मिळाली. सेवानिवृत्तीनंतर हौस म्हणून जवळजवळ संपूर्ण भारत त्यांनी पालथा घातलेला आहे. मुलगा अमेरिकेत स्थायिक झाल्यामुळे 'जावे डॉलरच्या देशा' येथेही त्यांच्या अनेक वाऱ्या झालेल्या आहेत. एकंदर आठ लेखांतून त्यांनी आपले अनुभव अत्यंत रसाळ शब्दांत व मन गुंतवून ठेवणाऱ्या शैलीत व्यक्त केलेले आहेत.

हे पुस्तक त्यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या प्रसंगी म्हणजे १२ सप्टेंबर २०१२ रोजी प्रकाशित झाले. त्यांच्यावर एक लेख याच अंकात अन्यत्र प्रकाशित झालेला आहे. अमृत महोत्सवी जन्मदिनाच्या निमित्ताने त्यांच्या हस्ते उत्तरोत्तर सरस्वतीची अखंड सेवा घडो ही शुभेच्छा.

('साद देती हिमशिखरे' संपर्क कुंदा देसाई ९८१९०५२३१९ मूल्य रु. १५०)

## 'YOGA THE ULTIMATE' : Durganand Gaitonde
## 'योग समाधी' : अनुवादक - मधुरा नाईक

सध्या पुण्यात स्थायिक झालेले श्री दुर्गानंद वामन गायतोंडे यांनी बऱ्याच आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहांत जबाबदारीच्या पदांवरून काम केलेले आहे. त्यांच्या व्यवसायामुळें त्यांचा शिपायांपासून अधिकाऱ्यापर्यंत सर्वांशी संपर्क येत असे. प्रत्येकाच्या आर्थिक, प्रापंचिक, शैक्षणिक समस्यांविषयी त्यांना जाणीव असे. त्यांमुळे त्यांचा मानवी दृष्टीकोनही विशाल होण्यास मदत झाली. निवृत्तीनंतर त्यांनी अध्यात्माकडे लक्ष केंद्रीत केले. गीता, उपनिषदे, जे. कृष्णमूर्ती, रमण महर्षी, स्वामी विवेकानंद, पाश्चिमात्य तत्त्ववेत्ते यांच्या लिखाणांचे त्यांनी मनन केले त्या विषयांवर त्यांनी YOGA THE ULTIMATE हे पुस्क प्रसिद्ध केले. त्यांचे वय सध्या ९३ वर्षे आहे. तरी ते अजूनही तरुणांनाही लाजवेल अशा उत्साहाने व ईर्षेने जीवन कंठित असतात. त्यांच्या सुदृढ प्रकृतीचे श्रेय ते योगसाधनेला देतात. या पुस्तकाचे सौ. माधुरी नाईक यांनी 'योग समाधी' असा अनुवाद केलेला आहे. 'योग समाधी' हा गहन विषय अगदी सोप्या व ओघवत्या भाषेंत वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी यशस्वीपणें केलेले आहे.

('योग समाधी' श्री समर्थ ग्रंथ भवन पुणे २४४५०९१५ मूल्य रु. १००)

## 'सुस्वागतम्' : शुभदा तेलंग

'सुस्वागतम्' या कवितासंग्रहाच्या लेखिका सौ. शुभदा गोविंद तेलंग या माहेरच्या शरद मुकुंद नाडकर्णी, मौजे अगळी. त्यांचे बालपण खेडेगांवांत आजोळी गेले. तेथे गणपती, नवरात्री, पंचमी अशी धार्मिक कृत्ये सतत चालत. परसाच्या बाहेर शेत, डोंगर व रान. बालपणी डोंगरातील झाडाझुडुपांतून त्यांचा लपंडावचा खेळ चाले. त्यामुळे त्यांना लहानपणापासूनच देवपूजन व निसर्ग यांकडे ओढा निर्माण झाला व त्यांतूनच त्यांना पुढे कविता रचण्याच्या स्फूर्तीला खतपाणी मिळाले. विवाह झाल्यावर त्यांना मुंबईत यावे लागले. आकाशवाणीवरील कार्यक्रम ऐकून आणि मासिकांतल्या कविता वाचून त्यांच्या सुप्त प्रतिभेला चालना मिळाली. नंतर त्यांनी कविता रचायला सुरुवात केली. आकाशवाणीवर काव्यवाचनाचे कार्यक्रम केले. तसेच वसुधा, वसंत सारख्या लोकप्रिय मासिकांत त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. 'प्रतिबिंब' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. तो दोन वर्षापूर्वी प्रसिद्ध झाला. त्याला रसिकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला. भरपूर कौतुक झाले. त्यामुळे त्यांना आणखीनच स्फूर्ती मिळाली. त्याचे फळ म्हणजे त्यांनी अलीकडेच 'सुस्वागतम्' हा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. या संग्रहात सुमारे सत्तर कविता आहेत व त्या निसर्ग, उत्सव, बालपण या विषयांवर आधारित आहेत. शुभदा तेलंग स्वत: उत्तम गायिकाही आहेत. त्यामुळे त्यांच्या कविता गेय व तालबद्ध झालेल्या आहेत.

('सुस्वागतम्', शुभदा तेलंग, माहीम २४४४०५३१  मूल्य रु. ७०)

## 'रंग उगवतीचे' : मीरा प्रभूवेर्लेकर

सौ. मीरा प्रभूवेर्लेकर या कारवार येथील अत्यंत नामवंत व्यक्ती रा. ब. गणपतराव तेलंग यांचे पुत्र व न्युजपेपर विक्रेते स्व. शंकर तेलंग यांची कन्या. त्यांचे वास्तव्य म्हापसा येथे असते. गेली सुमारे पंधरा वर्षे त्यांच्या लघुकथा, ललित लेख इत्यादी साहित्य निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहे. 'असुनी नात मी' या त्यांच्या निबंधाला २००९ साली मडगांवच्या गोमन्त विद्या निकेतनचा साहित्य पुरस्कार मिळाला होता. त्याचा तपशील पूर्वी मुखपत्रिकेंत आलेलाच आहे. अलीकडेच जुलै २०१२ मध्ये 'रंग उगवतीचे' या त्यांच्या ललितलेख संग्रहाचे पणजी येथे एका खास सोहळ्यांत प्रकाशन झाले. या संग्रहाला सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. सुभाष भेण्डे यांची प्रस्तावना लाभलेली आहे.

लेखिकेला पन्नाशीजवळ आल्यावर मागे वळून पाहतांना आयुष्यात आलेले विविध अनुभव शब्दांकित करावेत असे तीव्रतेने वाटू लागले. म्हणून विविध वृत्तपत्रांतून लेख लिहावयास सुरुवात केली. त्या पूर्वप्रकाशित स्फूट लेखांचा हा संग्रह आहे. आपले अनुभव शब्दांकित करतांना लेखिकेने हलकी फुलकी शैली उपयोगात आणली आहे. आपलं वय, आपला वर्ण, आपल्या आयुष्यांत आलेला एक पुरुष, त्यावेळचं प्रेम व आत्ताचं प्रेम, आपल्या काळ्या रंगामुळे अनेकदा वाट्याला



आलेले समर प्रसंग, आपले कर्तबगार आजोबा असे विविध विषय लेखिकेने समर्थपणे हाताळलेले आहेत.

('रंग उगवतीचे', मीरा प्रभूवेर्लेकर, म्हापसा ९४२०२४२३९६  मूल्य रु. ८५)

### विवाह / वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| स्वर्णा प्रभाकर गायतोंडे, बंगळूर | व | रवी मोहन नायक, मुलुंड |
| विराज प्रशांत कसबेकर, जोगेश्वरी | व | कानन अरूणकुमार पंड्या, नालासोपारा |
| जयेश जनार्दन कुलकर्णी, ग्रांटरोड | व | तेजस्विनी राजाराम कोशे, पुणे |
| सोनल जनार्दन कुलकर्णी, ग्रांटरोड | व | सौमित्र सुरेश राहतेकर, अंबरनाथ |
| मंदार शांताराम (सुभाष) वागळे, पारले | व | लीना सतीश सिनकर, गोरेगांव |
| कीर्ती प्रदीप वागळे, जोगेश्वरी | व | मदन मोहन पै, अंधेरी |

**Contact : Priya Prakash Telang**

*SHANTA CREATIONS*

**DIGITAL MEDIA**
- Website Designing & Development
- Flash Web Banners and Presentation
- Optimised Flash Website ❑ and more...

**PRINT MEDIA**
- Brochure Designing
- Catalogues & Product Box Designing
- Outdoor Media ❑ and more...

**3D & VFX**
- 3D Modeling, Texturing, Rigging, Lighting
- 3D Animation
- 3D Architectural Walkthrough
- Motion Graphics
- Visual Effects ❑ and more...

SHanTa™

**SHANTA I PORTAL PVT. LTD.**
Roman House, Opp. Tera Panth Bhavan, Nr. Cambridge School,
Thakur Complex, Kandivali (East), Mumbai - 400 101.
Cell : 93215 95487 / 98202 33202 ● Tele/Fax : 022-2854 2421
www.shantacreations.com ● info@shantacreations.com

# मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे प्रेरणा घेऊन यंदाही एक **'आनंद मेळावा'** भरविण्यांत येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, त्यांनाही गाळा मिळेल. बालगोपाळांसाठी करमणुकीचे खेळही ठेवण्यांत येणार आहेत. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : १६ डिसेंबर, २०१२ संध्याकाळी ५.०० ते ९.००
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, के.जी.एस. हाऊसिंग सोसायटीचे पटांगण, जोगेश्वरी.
**आकार** : रु. ७०० एका गाळ्यासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी.

**संजय नाडकर्णी : ९८२१४११३६६**
**प्रसाद गायतोंडे : ९८१९४११३३७**
**शैलेश गायतोंडे : ९८६९२११०५५**

**संपर्कासाठी अंतिम तारीख** : १० डिसेंबर, २०१२

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठ्या संख्येने हजर राहावे.

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

**स्थळ** : लवकरच कळविण्यांत येईल **प्रस्थान ठिकाण** : दादर, मुलुंड-ठाणे
**दिनांक** : रविवार १३ जानेवारी, २०१३
**आकार** : रु. ४०० प्रत्येकी ( ५ वर्षावरील मुलांना पूर्ण आकार)

बसच्या क्षमतेमुळे जागा मर्यादित. आकार भरल्यानंतरच नोंदणी.
आपल्या बँकेच्या ठाणे शाखेच्या खाते क्र. १८१६ मध्ये आकार भरण्याची सोय.

**- नोंदणीसाठी संपर्क -**

| **सुरेश पालेकर** | **राजू बोरकर** | **मारुती दळवी** |
|---|---|---|
| २५३६४३२८ | २४३७७६५३ | २५४०३६४२ |
| ९९६९४५५३७० | ९८२०९१७८४१ | ९९६९८२९५०५ |



# लोणावळा येथील प्रतिभावंत साहित्यिका आमची ताई कुंदा देसाई

## अवघे पाऊणशे वयमान

१२ सप्टेंबर २०१२ ला आमच्या ताईच्या (कुंदा र. देसाई) वयाला ७५ वर्षे पूर्ण झाली. मी तिच्यापेक्षा खूप लहान. पण तिच्या कर्तबगारी बद्दल थोडं लिहावसं वाटलं. तिचा हा जीवनप्रवास अनेकांना मार्गदर्शक ठरेल अशी खात्री आहे.

भावंडांवर निस्सीम प्रेम करणारी बहीण, स्वत:च्या मुलांवर उत्तम संस्कार करून सुसंस्कृत नागरिक बनविणारी एक प्रेमळ माता, विद्यार्थ्यांबद्दल अभिमान बाळगणारी आदर्श शिक्षिका, उत्तम लेखिका, संवेदनशील कवयित्री, उत्कृष्ट वक्ता, चारित्र्य संपन्न, सदा हसतमुख, शिस्तप्रिय अशी प्रतिभावंत स्त्री अशी विविध रुपे मी जवळून पाहिली आहेत.

१२ सप्टेंबर १९३७ रोजी सदाशिवगड येथे तिचा जन्म झाला. आम्ही मूळ अगळीचे नाडकर्णी. आमची आई म्हणजे शांताबाई व वडील शेषगिरी. अगळी सारख्या दुर्गम खेड्यात शिक्षणाची सोय नसल्याने तिचे शिक्षण मावस भावंडांबरोबर गडावरच झाले. आमच्या बाप्पाने (प.पू. कै. शुकमास्तर) व माईने तिच्यावर उत्तम संस्कार केले. ती त्यांची मानसकन्या होती. १९५७ साली तिचा विवाह कै. रघुवीर (सुधाकर) देसाई यांच्याशी झाला. लोणावळ्याला ते नौदलात शिक्षक म्हणून कामाला होते. स्वत: उच्च विद्याविभूषित असल्याने त्यांनी ताईच्या ठिकाणी असलेली प्रतिभा व शिक्षणाची ओढ ओळखली. पुणे विद्यापीठातून ती बी.ए. झाली. १२ वर्षाचे वैवाहिक जीवन आणि दोन मुले अशा छोटया परिवारात ती अत्यंत आनंदात होती. अचानक २२ सप्टेंबर १९७१ मध्ये आमच्या भावोजींचं अपघाती निधन झालं. तिच्यावर मोठं संकट कोसळलं. पण ती डगमगली नाही. तिने आलेल्या संकटाला धैर्याने तोंड दिलं. सासरची किंवा माहेरची मदत न घेता स्वाभिमानानं जगण्याचा तिनं वसा घेतला. आपलं दु:ख प्रदर्शित न करता फिनिक्स पक्षाप्रमाणे तिनं गरुड झेप घेतली. त्यावेळी मुलगी चि. मृदुला बारा वर्षांची व मुलगा चि. मिलिंद पाच वर्षांचा होता.

इंग्रजी भाषा आत्मसात करण्यासाठी चार वर्षे ऑक्झिलियम कॉन्व्हेंट येथे तिने शिक्षिकेचं काम केलं. १९७० साली सुप्रसिद्ध व्ही.पी.एस. प्रशाला व पुढे डी.पी. मेहता महाविद्यालयात अध्यापनाचं काम केलं. विद्यार्थ्यांसाठी अनेक नाटुकली लिहिली आणि ती जिल्हा परिषदेतर्फे आयोजित नाट्यस्पर्धेमध्ये सादर करून अनेक पारितोषिके प्राप्त केली. इथूनच तिचा लेखन प्रवास सुरु झाला. शिवाय राष्ट्रभाषा विशारद, सिनीयर हिन्दी, शिक्षक सनद, पंडित कोविद इत्यादी हिन्दी भाषेच्या परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन केले. पुढे विद्यापीठातून एम.ए. (मराठी), बी.एड्.

परीक्षेत प्रथम श्रेणी मिळविली. हे सर्व करताना मुलांचे उत्तम संगोपन व संस्कार केले. तिची कन्या मृदुला नामवंत वकील आहे. तसेच जावई माजी ॲडव्होकेट जनरल रवीन्द्र कदम हे सर्वांना सुपरिचित आहेत. पुत्र मिलिंद अमेरिकेत आज कॅलिफोर्निया राज्यातील पंधरा तज्ज्ञ सिव्हील इंजिनियरांपैकी एक गणला जातो. ही अभिमानाची गोष्ट आहे.

लोणावळ्याला तिच्या परिसरात मुसलमानांची वस्ती आहे. तेथील पालक अशिक्षित होते. त्यांच्या मुलांना योग्य दिशा दाखवून सुशिक्षित केलं. पहाटे ५ वाजता तिचा दिनक्रम सुरु व्हायचा. रात्री फक्त ४ ते ५ तास झोप घेत असे. तिच्या कष्टांचे चीज मुलांनी व तिच्या विद्यार्थ्यांनी केले. भारतातच नव्हे तर परदेशांत असलेले तिचे विद्यार्थी तिला आवर्जून भेटायला येतात. तेव्हां तिच्या डोळ्यांत कार्य साफल्याचे अश्रू तरळताना मी अनुभवले आहे. आदर्शमाता, आदर्श शिक्षिका, लेखिका म्हणून लायन्स क्लब, इनरवील क्लब व इतर संस्थांनी आणि माजी विद्यार्थ्यांनी तिचा सत्कार केला. तिचा ३२ वर्षे शैक्षणिक क्षेत्रातला प्रवास संस्मरणीय होता.


महाविद्यालयातून निवृत्त झाल्यावर तिने भारतभर प्रवास केला. अमेरिकेला तर मुलाकडे ती अनेक वेळा गेली आहे.

पुणे – मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकातून तिच्या कथा, कविता, प्रवासवर्णने प्रसिद्ध झाली आहेत. काही कथानकांना पारितोषिके मिळाली आहेत. सिंधू आर्ट्स लोणावळा तर्फे 'ऋणानुबंध' आणि 'पाऊलवाटा' हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले आहेत. वाङ्मयसेवा प्रतिष्ठान नाशिकांतर्फे 'पाऊलवाट' या पुस्तकाला पुरस्कार मिळाला आहे. तिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'साद देती हिम शिखरे' हे प्रवासवर्णन सिंधू आर्ट्स तर्फे प्रकाशित करण्यांत आले. तिच्या कविता अष्टपदी, रोहिणी, आश्विनी, काव्यगंध मधून प्रकाशित झाल्या आहेत. ८ एप्रिल २०१२ मध्ये दहिसर (सध्या वास्तव्य) मनसे तर्फे तिचा जाहीर सत्कार झाला. तीने स्वातंत्र्यवीर कै. प्रकाशभाई मोहाडीकर यांच्याबरोबर वसंत व्याख्यानमालेंत काम केलेल आहे. सध्या ती लोणावळा व तळेगाव येथील संस्थेत कार्यरत आहे. तिचा मित्र परिवार खूप मोठा आहे. लेखन, वाचन, विणकाम व प्रवास हे तिचे आवडते छंद. तिचं आवडतं वाक्य 'ऑल ईज वेल', जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन असल्याने ती नेहमी समाधानी असते. तिचा आम्हां भावंडांना खूप अभिमान व आदर वाटतो. तिच्या ७५व्या वाढदिवसा प्रीत्यर्थ तिला निरामय आयुष्य लाभो व तिच्या हस्ते सरस्वतीची सेवा घडो, अशी श्रीमंगेश व श्री स्वामी समर्थ यांच्या चरणी आम्ही भावंडे प्रार्थना करतो.

**सौ. माधुरी गु. गुंजीकर**

डोंबीवली – ०२५१-२४३२४४६





## वैलॉ वाडॉ, माजाळी येथील विश्वंभर विनायक वागळे यांचे कुटुंब, १९२८

**खुर्चीवर :** १. जयवंत वि. वागळे, २. पुरुषोत्तम★(दुगा) वि. वागळे, ३. महादेव वि. वागळे, सोबत पुत्र रमाकांत, ४. विश्वंभर विनायक वागळे, ५. सरस्वती विश्वंभर वागळे, ६. गणपत वि. वागळे, सोबत पुत्र मनोहर, ७. विनायक (भवानी) वि. वागळे

**मागे :** १. राधाबाई जयवंत वागळे, २. कृष्णाबाई पुरुषोत्तम वागळे, ३. पार्वती महादेव वागळे, ४. तारा महादेव वागळे (तारा सुब्राय दिवेकर, केरवडी), ५. रुक्मिणी★★ विठ्ठल वागळे, ६. रमाबाई गणपत वागळे

**बसलेले :** १. दत्ताराम (बाबुराय) गणपत वागळे, २. शिवानंद (शिबानी) महादेव वागळे, ३. कमलाकर पुरुषोत्तम वागळे
४. मुक्ताबाई गणपत वागळे (मुक्ताबाई काशिनाथ नाडकर्णी, अगळी), ५. सुशीला गणपत वागळे,
६. अनसूया महादेव वागळे (अनसूया शिवानंद वाघ, हारवाडे), ७. शालिनी महादेव वागळे

**टीप :** १. विश्वंभर वागळे निवृत्त झाल्यावर कारवार येथे मास्तर वाड्यावर स्वत:च्या घरांत स्थायिक झाले तेथे हा फोटो सापडला.
२. या फोटोपैकी दोनच व्यक्ती हयात आहेत, अनसूया आणि मुक्ताबाई.

★ पुरुषोत्तम (दुगा) वागळे हे ज्ञातीतले पहिले M.Ag. शेतांमधील बांधावर (कोंकणीत मेरेवर) राहणारे लहान खेकडे यांपासून पिकाची नासाडी थांबविण्यावर उपयोगी संशोधन. पुणे येथील शेतकी कॉलेजमध्ये ENTOMOLOGY विषयाचे प्राध्यापक. जुन्या काळी प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या शेतकी खात्यांतील जॉईंट डायरेक्टर या पदावरून निवृत्त.

★★ विठ्ठल वागळे हे विश्वंभरचे बंधू. त्यांनी संन्यास घेतला व अनिरुद्धस्वामी हे नांव धारण केले. रुक्मिणी ऊर्फ शांत्याका या बाड येथील श्री पद्मनाभस्वामी यांच्या एकनिष्ठ भक्त होत्या.

(प्रायोजित)





## श्रीमती शांताबाई (धोंड) बोरकर यांची जन्मशताब्दी

## आमची आई (वैनी)

आम्ही आईला 'वैनी' म्हणता होतो. त्याला एक कारण आहे. आमची एक आत्या आमच्या बरोबरच रहायची. ती अर्थातच आमच्या आईला 'वैनी' म्हणायची म्हणून आम्हीही तिला 'वैनी' म्हणत असू.

आमची आई म्हणजे शांताबाई विठ्ठल बोरकर. इ.स.१९१२ सालचा तिचा जन्म असल्याने हे तिच्या 'जन्मशताब्दीचे' वर्ष आहे. तिच्या जन्माचीही एक कथा आहे. तिचे वडील श्री. राघवेन्द्र रा. दिवेकर हे त्याकाळी कारवारचे 'कलेक्टर' होते. त्यांची मुले जगत नव्हती आणि पहिली जगली ती माझी आई. तिच्यानंतर मात्र तिला दोन भाऊ व एक बहीण अशी भावंडे झाली. पहिली मुले जगत नसल्याने माझ्या आईला प्रथम नावच ठेवले नव्हते. सर्वजण तिला 'धोंड' म्हणत. नंतर तिचे 'कमल' हे नाव ठेवले पण अद्यापही लोक 'तू धोंडाली चली मगो' असे विचारतात. त्याकाळी ती खूप लाडाकोडात वाढली. घरी नोकर-चाकर व सर्व सुखसोयी होत्या. त्याकाळी ती कॉन्व्हेंटमध्ये शिकली. घोड्यावर बसायलाही शिकली. त्यावेळी फक्त पुरुषांची मक्तेदारी असलेला बॅडमिंटन हा खेळही ती खेळत असे. इंग्रजीतून शिक्षण घेतल्याने तिची इंग्रजीतली सही पाहून पोस्टमननाही आश्चर्य वाटायचे.

पुढे कस्टम खात्यातील 'श्री विठुल सदाशिव बोरकर' यांच्याशी विवाह होऊन ती सौ. शांताबाई विठुल बोरकर झाली. आमचे वडील म्हणजे अतिशय शांत माणूस. या माणसाला राग माहीत नव्हता. आम्हांला मारणे तर दूरच, कधी मोठ्याने ओरडतही नव्हते. बोलणेही हळू आवाजात. त्यांच्या खात्यात तर त्यांना 'देवमाणूस' म्हणूनच ओळखत यातच सर्व येते. कारण कस्टम सारख्या खात्यात असूनही मोहापासून दूर राहून प्रामाणिकपणे काम करणे म्हणजे कठीणच होते. सतत बदल्या होत असल्याने आमच्या शिक्षणासाठी आम्ही सहा भावंडे व आई कोल्हापूरला एकाच ठिकाणी राहिलो व आमचे वडील बदलीच्या ठिकाणी राहिले. आईनेच सर्व जबाबदारीने आम्हां तिघी बहिणींना पदवीधर केले व आमच्या भावांना इंजिनियर पर्यंत शिक्षण दिले.

तिच्यामध्ये जुन्या व नव्या दोन्ही विचारांचा सुरेख संगम झाला होता. त्या काळची असल्याने नऊवारी साडी, तसेच रूढी परंपरा यांना जपणारी पण नवीन विचारांनाही विरोध न करणारी अशी ती होती. नवीन विचारांच्या नव्या पिढीबरोबर जाणारी होती. त्याकाळी कोल्हापूरला स्त्रियांना सिनेमाचे तिकीट कमी दराचे होते व बसण्यासाठी स्पेशल व्यवस्था असे. आम्हांला सोबत म्हणून तिला बोलवले तर तीही आमच्या बरोबर हिंदी सिनेमाला सुध्दा येत असे. तिच्या नातींना हल्लीच्या फॅशनची सागर चोटीही तिनेच घातलेली आवडे. आपल्या सहा मुलांना शिस्त लावणे, त्यांना चांगले



चांगले खाणे व जेवण करून घालणे. घरी आलेल्यांनाही तृप्त करून पाठवणे, अशा वातावरणात, आम्ही वाढलो. माझ्या बाबतीत तर 'आई थोर तुझे उपकार' यात आणखी एका उपकाराची भर पडली. ती म्हणजे तिच्याकडे दोन्ही मुलांना ठेऊन मी नोकरीला जाऊ शकले. तिला शिक्षणाची खूप आवड होती. त्यामुळे तिची नातवंडे डॉक्टर, इंजिनियर, सी.ए. झालेली पाहून ती खूप खूष झाली. तिचा एक नातू तर स्कॉलरशिपवर अमेरिकेला शिक्षणासाठी गेल्याचे ती सर्वांना कौतुकाने सांगत असे.

तिला मरणही चांगलेच आले. १९९८ साली नवरात्रीच्या दिवसांत व तेही एक दिवसाच्या आजाराने. जास्त कुणाकडून सेवा करून न घेता अगदी शांतपणे. तिच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आम्हां सर्वांकडून तिला ही श्रध्दांजली. पण परत परत मनांत येते 'आई तुझी आठवण येते'.

**सौ. सुहालिनी अरविंद वर्टी**

(प्रायोजित) जोगेश्वरी (पूर्व)

## ठाणे मंचाच्या गेल्या वसंतोत्सवांत मराठी शब्दांना समानार्थी कोंकणी शब्द लिहिण्याची अनोखी स्पर्धा

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात मंजिरी कुलकर्णी यांनी गेल्या एप्रिल महिन्यांत ठाणे मंचने आयोजित केलेल्या वसंतोत्सवावर एक लेख लिहिला होता. त्या लेखांत मूळ मराठी शब्दांना कोंकणी समानार्थी शब्द लिहिण्याची एक अनोखी स्पर्धा ठेवली होती असा एक उल्लेख आहे. सध्याची कारवारी पिढी ही शहरांतच वाढलेली असल्याने ते कोंकणी बोलतांना मूळ पारंपरिक शब्द विसरून मराठी शब्द मिसळून बोलतांना आढळून येते. आतां तर इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाने वाक्यरचना आणखीनच इंग्रजाळलेली आहे. या संदर्भात सदर अनोखी स्पर्धेत उपस्थितांना एका कागदावर २५ मराठी शब्द छापून दिले होते. त्या शब्दांच्या पुढच्या मोकळ्या जागेत समानार्थी कोंकणी शब्द लिहिण्यास सांगितले होते. असे या स्पर्धेचे स्वरूप होते. इतर अभ्यासू वाचकांसाठी ते २५ शब्द खाली उद्धृत केलेले आहेत.

### मराठी शब्द

१. गवार , २. काथा , ३. पिशवी , ४. शेंबूड , ५. भूत , ६. फोड (उदा. बटाट्याची) , ७. खोली, ८. रांजण मोठा , ९. खूप खूप दूर , १०. विरजण , ११. माशी , १२. रवी (ताक घुसळण्याची) , १३. गुडघा , १४. खरवस , १५. कचरा , १६. नदी , १७. उंदीर , १८. झाकणी , १९. झाडू , २०. केळीच्या पानाचा तुकडा , २१. झुरळ , २२. चटई , २३. वहिनी , २४. घाम , २५. कोपऱ्यात


(समानार्थी कोंकणी शब्द पृ. २६ वर)

## भटवाडी, गिरगांव येथील लक्ष्मीबागेची शंभरी

गेल्या शतकाच्या पहिल्या अर्ध्यांत कारवारकरांच्या घरांतील उपनयन, साखरपुडा, विवाह, तिळगूळ समारंभ, हळदीकुंकू इत्यादी मंगलकार्ये बहुधा दाभोळकर कुटुंबीयांच्या भटवाडी येथील लक्ष्मीबाग या सभागृहातच होत असत. किंबहुना कारवारकरांचे विवाह व लक्ष्मीबाग हे एक समीकरणच झाले होते. कारवारकरांचा लक्ष्मीबागेशी अप्रत्यक्ष नात्याचा संबंध म्हणजे लक्ष्मीबाई दाभोळकर यांचे नातू कै. लक्ष्मीकांत दाभोळकर यांच्या पत्नी इंदुमती उर्फ गंगा या बाडच्या वागळे घराण्यातल्या होत्या. अशा या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तूला शंभर वर्षे पूर्ण झाली म्हणून हा थोडासा पूर्वेतिहास.

सारस्वतांपैकी एक कर्तबगार व कुलीन घराणे म्हणजे नामदार नारायण वासुदेव दाभोळकर यांचे. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई या अत्यंत धर्मनिष्ठ व कनवाळू होत्या.त्यांच्या मृत्यूपत्रानुसार त्यांचे चिरंजीव शांताराम दाभोळकर यांनी ही अत्यंत देखणी व उपयुक्त अशी वास्तु बांधली व त्यास 'लक्ष्मीबाग' असे सार्थ नाव दिले. या सभागृहामुळे सारस्वतांचीच नव्हे तर इतर मराठी कुटुंबांची फार मोठी सोय झाली. या सभागृहाचे सुरुवातीपासून भाडे फार माफक ठेवण्यात आलेले आहे व ते सर्वांना परवडणारे आहे.

मंगलकार्यांशिवाय व्याख्याने, कीर्तन, सर्वसाधारण सभा यासाठीही हे सभागृह सोयीस्कर आहे. पण लक्ष्मीबागेचे खास वैशिष्ट्य म्हणजे हे सभागृह अकौस्टिक्सच्या दृष्टीने शास्त्रीय संगीताच्या मैफिलीसाठी आदर्श आहे. काही पट्टीचे गवई तर त्यांच्या कार्यक्रमांसाठी लक्ष्मीबागेचा आग्रह धरत. अनेक नामांकित गायक व वादक यांनी रात्ररात्र गाजविलेल्या मैफिली बुजुर्ग श्रोत्यांच्या कायमच्या स्मरणांत असत.



लक्ष्मीबागेचा सदर फोटो 'महाराष्ट्र सारस्वत' वर्ष १, अंक ३, मार्च १९१७ या अंकातून उद्धृत केलेला आहे.

**द. ना. नाडकर्णी,**
पारले (२६१२४१६२)



## आमचे बाबा : जी. बी. मिटबंदर

२९ एप्रिल २०१२, मुंबईत पहाटेची वेळ, अमेरिकेतील २८ तारखेची संध्याकाळ. फोन वाजला... 'वाईट बातमी आहे, .... मिस्टर मिटबंदर हॅज पास्ड् अवे.' धस्स झाले. कसे शक्य आहे? आत्ताच दोन दिवसांपूर्वी मी त्यांना अमेरिकेत विमानतळावर 'बाय' केले होते. मुंबईत आपल्या घरी परत जायचे म्हणून किती आनंदात होते.

गंगाधर मिटबंदर हे माझे बाबा. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९३१ साली अस्नोटी इथे झाला. त्यांची आई कै. शांताबाई व वडील कै. भिकोबा ऊर्फ भिकु मिटबंदर. एकेकाळी कारवारकरांनी गजबजलेल्या फर्ग्युसन कंपनीत ते कामाला होते. त्यांनी असंख्य कारवारकरांना नोकऱ्या मिळवून दिल्या होत्या. बाबांचे शिक्षण राम मोहन हायस्कूल गिरगांव ह्या शाळेत झाले. त्यांनी मॅट्रीकमध्ये गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. पुढचे शिक्षण एलफिन्स्टन कॉलेज व नंतर व्ही.जे.टी.आय् मधून त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरींग मध्ये पदवी मिळविली. दोन तीन कंपन्यांकडून बाबांना नोकरीच्या संधी आल्या. पण आपल्या वडिलांची तब्येत बरी नसल्यामुळे त्यांनी बाहेरगांवच्या संधी स्वीकारल्या नाहीत. नोकरी स्वीकारली ती मुंबईतील बी.ई.एस.टी. मध्ये इंजिनियर म्हणून.

बेस्टची नोकरी ही बाबांची पहिली व शेवटची. पदोन्नती मिळता मिळता ते १९८५ मध्ये बेस्टचे महाव्यवस्थापक म्हणून निवडले गेले. ती अगदी अभिमानाची गोष्ट होती. ह्या पदावर असताना त्यांनी बेस्ट मध्ये अनेक लाभदायक सुधारणा केल्या व सन्मान मिळविले. बेस्ट हे 'ट्रान्सपोर्ट सिस्टम' चे उत्कृष्ट उदाहरण म्हणून त्यांना माजी प्रधानमंत्री श्री राजीव गांधी ह्यांच्या हस्ते पुरस्कार दिला गेला. दुसरे पारितोषिक माजी राष्ट्रपती श्री वेंकटरमन यांच्या हस्ते मिळाले. १९८७ साली आपल्या संघाने बाबांना वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करून त्यांचा सन्मान केला.

बाबांचे व्यक्तिमत्त्व एकदम उत्कृष्ट. त्यांचा स्वभाव एकदम नम्र, पण शिस्तीच्या बाबतीत अगदी कठोर. प्रत्येक वस्तु जागच्या जागी पाहिजे होती. त्यांचे 'ऑर्गनायझेशन स्कील्स', 'मॅनेजमेन्ट स्टाईल', 'व्यवस्थितपणा' व 'मोठ्या माणसांचा आदर', ह्या शिकण्यासारख्या गोष्टी होत्या. ते सतत आम्हाला ह्या जगात कसे वावरले पाहिजे, ह्याबद्दल अनुभवावरून उपदेश देत असत. जरी वरून 'गंभीर स्वभावाचे'वाटले तरी त्यांची विनोद बुद्धी जवळच्या माणसांना दिसून यायची. त्यांची स्मरणशक्ती ही जगापलीकडली होती. अभ्यास करत असताना ते पुस्तक बंद करून कुठच्या पानावर एखादा विषय आहे, हे ते अचूक सांगू शकत. त्यांचे गणित एकदम पक्के होते. बेरीज करीत असताना आम्ही मजा म्हणून त्यांची शर्यत एखाद्या कॅलक्युलेटरशी लावत असू, पण नेहमी तेच जिंकायचे.

आम्ही तीनही मुलं अमेरिकेला असतो. गेली काही वर्षे आई म्हणजे सविता ( सुप्रसिध्द साहित्यिक डॉ. अ.वा. वर्टी यांची कन्या ) व बाबा अनेकदा आमच्याकडे येऊन गेले, व आम्हा सर्वांना त्यांचा सहवास लाभला. बाबांची उणीव आम्हाला नेहमीच भासणार. ते आमचे वडील होते ह्याचा अभिमान आम्हा मुलांना नेहमीच राहणार.

(प्रायोजित)

**सौ. अमिता सोहोनी, अमेरिका**

## निधन

| | | |
|---|---|---|
| आशा उदय डोंगरे (पूर्वाश्रमीच्या आशा विनायक नाडकर्णी) | (अंकोला) | बोरीवली |
| शीला गोखले (पूर्वाश्रमीच्या शीला महाबळेश्वर देसाई) | (व्हंडक्कल) | ठाणे |
| भवानीशंकर गोविंद कसबेकर | (खारगे) | गिरगाव |
| मालती मधुकर कामत (पूर्वाश्रमीच्या इंदू कंटक) | (अंकोला) | दादर |
| सुधाकर मंगेश कुलकर्णी | (अवर्सा) | पुणे |
| आशा रमेश कुलकर्णी (पूर्वाश्रमीच्या आशा पांडुरंग करुर) | (शिरसी) | बडोदा |
| मंगेश (सुधीर) बाळकृष्ण कुलकर्णी | (किन्नर) | बंगळूर |
| गंगाधर भिकोबा मिटबंदर | (अंकोला) | घाटकोपर |
| कुमुदीश परमानंद मुझुमदार | (अंकोला) | वांद्रे |
| सुधा वसंत नाईक (पूर्वाश्रमीच्या सुधा पुंडलीक इस्लूर) | (शिरसी) | उडपी |
| मोहन विनायक नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| सीताराम मुकुंद नाडकर्णी | (सांवरपै) | अंधेरी |
| अल्पना प्रभाकर नाडकर्णी | (सांवरपै) | ठाणे |
| नारायण शामराव नाडकर्णी | (सांवरपै) | ठाणे |
| सीमा शिवराव (पोपटी) नाडकर्णी | (अंकोला) | बंगळूर |
| शरच्चंद्र गोपाळराव पालेकर | (बिणगे) | गिरगांव |
| महेश महाबळेश्वर फेणाणी | (चेंडिये) | गोरेगांव |
| निर्मला (लीला) शरद पिकळे | (अंकोला) | माहीम |
| प्रेमा भालचंद्र तेलंग | (नंदव्हाळ) | मुलुंड |
| वासुदेव (बाबू) पुरुषोत्तम तेलंग | (हारवाडे) | शिकागो |
| दुर्गाबाई रामकृष्ण तेलंग | (बाड) | ताडदेव |
| शशिकांत पद्मनाभ वाघ | (हारवाडे) | बोरीवली |
| सिंधू रमाकांत वागळे | (माजाळी) | पारले |
| मनोहर गणपत वागळे | (माजाळी) | माहीम |
| शशिकांत भालचंद्र वागळे | (माजाळी) | माहीम |
| शिवानंद (प्रमोद) वामन वागळे | (माजाळी) | हुबळी |
| शिरीष जगन्नाथ वागळे | (बाड) | भाईंदर |
| वामन कृष्णा वागळे | (बाड) | गोरेगांव |
| प्रभाकर वामन वर्टी | (बाड) | माहीम |



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

## उल्लेखनीय देणग्या

### 'कारवार गांधी' यांची कन्या श्रीमती सीताबाई (ताराबाई) वागळे यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी संघाला एक लाख एक रुपयांची देणगी

सात आठ दशकांपूर्वी मूळ व्हंडक्कल या गांवचे श्री गणपत अनंत देसाई ऊर्फ बाप्पा कारवार येथे स्थायिक झाले. त्यांच्या जमान्यात पोलीस खात्यामध्ये भारतीयांना केवळ इन्सपेक्टर या पदापर्यंतच पोहोचता येत असे. त्याहून वरच्या हुद्यावर केवळ गोऱ्या साहेबांची मक्तेदारी असायची. बाप्पा हे १९२९ मध्ये इन्सपेक्टर या भारतीयांसाठीच्या अत्युच्च पदावरून निवृत्त झाले. निवृत्त झाल्यावर लगेच त्यांची जीवनशैली बदलली. ते कट्टर गांधीवादी झाले. चरख्यावर सूत कातून त्यांचे कापड बनवीत. फक्त गुडघ्यापर्यंत पंचा, नाकावर किंचित झुकलेला चष्मा, हातात लांब काठी, पायात वहाणा यामुळे ते गांधींसारखेच भासत. त्यांना 'कारवार गांधी' असे म्हणत. इन्सपेक्टरच्या पदावरुन निवृत्त झाल्यावर बाप्पा 'बापू' झाले. आपल्या जेवणाच्या पंगतीत ते मुद्दाम हरिजनांना सामील करून घेत. जुन्या काळांत घराच्या बाहेर टोपलीचे संडास असत व त्या टोपल्या हरिजनांनी खांद्यावरून वाहून नेण्याची अत्यंत घृणास्पद व लाजिरवाणी व्यवस्था असे. बाप्पांना ते दृष्य अजिबात सहन होत नसे. बाप्पा आपल्या संडासातील टोपली स्वत: उचलून त्यांतील मैला एका खड्ड्यात गाडून टाकत असत. असे त्यांचे आचरण होते.

त्यांच्या मुलांमध्ये दोन जुळ्या मुली होत्या, तारा व हिरा. उभयतांची यंदा जन्मशताब्दी. तारा या विवाहानंतर सीताबाई विनायक वागळे झाल्या. त्यांची मुले सर्वश्री मधुकर (गोकुळ), अनिल, डॉ. अशोक व श्रीमती शुभदा दिलीप फेणे यांनी अलीकडेच आईच्या जन्मशताब्दी प्रसंगी आईवडिलांच्या स्मरणार्थ संघाला एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री विश्वनाथ (विसू) कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी

मूळ अवर्सा या गांवचे कै. विश्वनाथ (विसू) शेषगिरी कुलकर्णी हे ग्लॅक्सो या जगप्रसिद्ध औषध निर्मितीच्या उद्योगसमुहातून क्वालिटि कन्ट्रोल मॅनेजर या उच्च पदावरून निवृत्त झाले होते. निवृत्तीनंतरसुद्धा त्यांचा दांडगा अनुभव लक्षांत घेऊन कंपनीने त्यांची दोन वर्षासाठी टेक्निकल ऑडीट मॅनेजर म्हणून नियुक्ती केली होती. ऑगस्ट २०१० मध्ये त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती हेमलता यांनी अलीकडेच आपल्या पतीच्या स्मृतीप्रीत्यर्थ आपल्या एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## प्रा. प्रभाकर नाडकर्णी यांजकडून एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी

सांवरपैचे कै. नागेश पांडुरंग नाडकर्णी व कै. सावित्री (कावेरी) यांचे कुटुंबीय विविध प्रसंगी सातत्याने आपल्या संघाला व एज्युकेशन सोसायटीला भरघोस देणग्या देत असतात. अशा सर्व देणग्यांची एकूण रक्कम तीस लाखाच्या घरात जाईल. त्यांचे चौथे सुपुत्र प्रा. प्रभाकर नाडकर्णी बंगळूर येथे सध्या स्थायिक झाले आहेत. त्यांनी आपले तीन वडील बंधू कै. महेश्वर, कै. सच्चिदानंद व कै. विश्वनाथ यांच्या स्मरणार्थ अलीकडेच एज्युकेशन सोसायटीच्या शतसांवत्सरिक निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री मोहन वागळे यांजकडून संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी

मूळ अस्नोटी या गांवचे व सध्या अंधेरी येथे राहणारे श्री मोहन शांताराम वागळे हे सचिवालयात कामाला होते. निवृत्ती समयी ते सिंचन विभागाच्या अकाउंट्स खात्यात डेप्युटी डायरेक्टर या पदावर होते. अलीकडेच त्यांनी संघाच्या समाजसेवा निधीसाठी म्हणून पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्रीमती सुमन वागळे यांजकडून संघाला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

पुणे येथील श्रीमती सुमन व कै. रुद्रा (बाबुराव) रामचंद्र वागळे हे आपल्या संघाला एज्युकेशन सोसायटीला विविध प्रसंगी भरघोस देणग्या देत असतात. श्री वागळे यांचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथीप्रसंगी दरवर्षी सुमनताई पतीच्या स्मरणार्थ देणग्या देतात. यंदाही श्री वागळे यांच्या तृतीय पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांनी संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## कै. आनंद वर्टी यांच्या अमृतमहोत्सवी जन्मदिनाच्या प्रसंगी वृद्धसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात कोंकणी, कन्नड व मराठी अर्थात् 'कोकम' या तीनही भाषेंत दर्जेदार साहित्य निर्माण करणारे कै. आनंद वर्टी यांच्या 'आनंद तरंग' या पुस्तकाच्या हृद्य अशा प्रकाशन समारंभाचा तपशील दिला होता. १७ जून २०१२ हा त्यांचा अमृतमहोत्सवी जन्मदिन. त्याप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती अनुराधा वर्टी यांनी संघाच्या वृद्ध सेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री अरुण कसबेकर यांजकडून परममित्र श्री शशिकांत वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक लाख रुपयांची देणगी

श्री अरुण भास्कर कसबेकर हे विविध प्रसंगी आप्तेष्टांच्या व त्यांना वंदनीय असलेल्या व्यक्तींच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुक्तहस्ते देणग्या देतात हे सर्वांना माहित झालेले आहे. माहीम येथे राहणारे त्यांचे एक आतेभाऊ श्री शशिकांत भालचंद्र वागळे हे अमेरिकेंत गेल्यावेळी तेथेच त्यांचे दुःखद



निधन झाले. दोघेही एकमेकांचे नातेवाईक होतेच पण त्याशिवाय परममित्रही होते. श्री कसबेकर यांनी आपल्या परममित्राच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाच्या वृद्ध सेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. श्री कसबेकर यांनी दिलेल्या सर्व देणग्यांची एकूण रक्कम आता २६ लाख एवढी झाली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्रीमती वैशाली विद्याधर कुलकर्णी यांजकडून | ५,००० |
| २. | श्रीमती शांता व श्री मंगेश महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाह दिनाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा (गीता) रमेश वागळे यांजकडून | ६,००० |
| ३. | श्रीमती स्नेहलता व श्री गजानन नारायण नाडकर्णी यांच्याकडून विवाहाच्या सुवर्णवर्षानिमित्त | २५,००० |
| ४. | श्रीमती लक्ष्मीबाई व डॉ. नारायण सर्वोत्तम तेलंग यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती गीता विश्वनाथ आगशीकर यांजकडून विवाहाच्या सुवर्णवर्षानिमित्त | ५,००० |
| ५. | श्रीमती दुर्गाबाई यशवंत कुलकर्णी यांच्या २५व्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती वीणा अनिल नाडकर्णी व पुत्र श्री प्रशांत य. कुलकर्णी यांजकडून | २०,००० |
| ६. | श्रीमती इंदिराबाई व श्री शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री किशोर यांजकडून | १,००१ |
| ७. | अनामिकाकडून | ३,००० |
| ८. | प्रा. व्ही. टी. यार्दी ट्रस्ट कडून | १,८७५ |
| ९. | श्रीमती सीताबाई व डॉ. विनायक विश्वंभर वागळे यांच्या स्मरणार्थ श्रीमती सीताबाई यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र सर्वश्री मधुकर (गोकुळ), अनिल, डॉ. अशोक व कन्या श्रीमती शुभदा दिलीप फेणे यांजकडून | १,००,००१ |
| १०. | श्री मोहन शांताराम वागळे यांजकडून | ५०,००० |
| ११. | श्री रुद्रा रामचंद्र वागळे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या तृतीय पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती सुमन यांजकडून | ५०,००० |
| १२. | अनामिकाकडून | १,००१ |
| १३. | श्रीमती कृष्णाबाई गणपत वागळे यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी कन्या श्रीमती शालिनी कमलाकर नाडकर्णी यांजकडून | ५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री अनिल भालचंद्र तेलंग यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री पराग यांजकडून | १५,००० |
| २. | श्री प्रदीप विश्वेश वागळे यांच्या ६०व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती माया मनोहर पालेकर यांजकडून | ५,००० |

३. श्रीमती सुनंदा (सरिता) विनायक मुझुमदार यांच्या पुण्यतिथी निमित्त
खालील नातेवाईकांकडून प्रत्येकी रु. १००१
१. कु. मेधा विनायक मुझुमदार (बहीण), २. सौ. शैलजा गिरीश बोरकर (बहीण),
३. श्री गिरीश प्रभाकर बोरकर (मेहुणे), ४. कु. निखिल गिरीश बोरकर (भाचा),
५. श्री शांताराम (परेश) यशवंत वागळे (मामेभाऊ), ६. सौ. शीतल बाळकृष्ण खडपे (मामेबहीण), ७. डॉ. बाळकृष्ण मोहन खडपे (मेहुणे), व
८. कु. मनस्वी बा. खडपे (भाची). ८,००८

## वृद्धसेवा निधीसाठी

१. श्री सुरेन्द्र शांताराम कुलकर्णी यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती अलका सुरेन्द्र सरदेसाई व पुत्र श्री अनिल सुरेन्द्र कुलकर्णी यांजकडून ५,०००
२. श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या २५व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री अरुणकुमार यांजकडून १०,०००
३. श्री आनंद गणपती वर्टी यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती अनुराधा यांजकडून ५०,०००
४. नातवंडांच्या वाढदिवसानिमित्त श्री किशोर दत्तात्रय बोरकर यांजकडून ५,०००
५. श्रीमती ताराबाई दिनकर तेलंग यांच्या स्मरणार्थ मुलांकडून ३५,०००
६. श्रीमती रमाबाई व श्री रंगराव इस्लूर ट्रस्टकडून १,००,०००
७. श्री गजानन सीताराम बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विमल यांजकडून १०,०००
८. काकी, हिरामावशी व तारामावशी यांच्या स्मरणार्थ भाची कडून १५,०००
९. श्री मंगेश रुद्रा पालेकर यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त बहीण श्रीमती सुजाता सुब्राय वागळे यांजकडून ५,०००
१०. श्रीमती कुसुम विश्वेश वागळे यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती माया मनोहर पालेकर यांजकडून ५,०००
११. श्रीमती शांताबाई व श्री रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या स्मरणार्थ नातवंडे श्रीमती अपर्णा व श्री अनिरुद्ध दीपक बोरकर यांजकडून ५,०००
१२. श्री अरुण भास्कर कसबेकर यांजकडून नातेवाईकच नव्हे तर परम मित्र असलेल्या श्री शशिकांत भालचंद्र वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ १,००,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. डॉ. श्रीमती वैशाली विद्याधर कुलकर्णी यांजकडून ५,०००



२. श्री उपेन्द्र किणी यांजकडून २,५००
३. श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून १०,०००
४. श्रीमती रमाबाई व श्री रंगराव इस्लूर ट्रस्टकडून १,००,०००
५. श्रीमती उषा वासुदेव गायतोंडे यांच्या १८व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री वासुदेव शांताराम गायतोंडे यांजकडून १०,०००
६. श्री जयवंत शांताराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ श्री शरदचंद्र शांताराम गायतोंडे यांजकडून १०,०००
७. प्रा. व्ही. टी. यार्दी ट्रस्टकडून १,१२५
८. श्री विश्वनाथ शेषगिरी कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती हेमलता यांजकडून १,००,०००
९. श्रीमती निर्मला परेश नाडकर्णी यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री परेश मारुती नाडकर्णी यांजकडून १,०००
१०. श्री माधव दत्तात्रय वर्टी यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून १,०००
११. श्रीमती कुसुम व श्री शेषगिरी सर्वोत्तम सोहोनी यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री मिलिंद व स्नुषा श्रीमती शुभांगी मिलिंद सोहोनी यांजकडून ५,००१

## शतसांवत्सरिक निधीसाठी

१. वडील बंधू सर्वश्री महेश्वर, सच्चिदानंद व विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ श्री प्रभाकर नागेश नाडकर्णी यांजकडून १,००,०००

**ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ — सूचना**

वधूवरांची नोंद करू इच्छिणाऱ्या पालकांना नम्र विनंती करण्यांत येत आहे की, त्यांनी आपली नोंदणी घराजवळ असलेल्या केंद्रावरच (जोगेश्वरी, बोरीवली, दादर, मुलुंड, ठाणे) करावी. आपण ज्या केंद्रात नोंदणी केली असेल तेथूनच माहिती घ्यावी.

**– सुरेश पालेकर**

## पृष्ठ १८ वर दिलेल्या शब्दांचे पर्यायी कोंकणी शब्द

१. चिटमिटकी २. सोण्ण ३. चिरी ४. सैंत ५. म्हारू ६. फाक ७. कूड ८. भाण
९. कोकस्तान १०. मॅणाय ११. मूंस १२. खवलॉ १३. दिंबी १४. पोस १५. कोयर
१६. न्हय १७. विंदूर १८. मांड १९. सान्न २०. चोळको २१. जल्लॉ २२. मांद्री
२३. व्हनी २४. हूम २५. मुल्यात

# Shailesh Gaitonde

## Account Consultancy

**OFFICE** : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E),
Mumbai - 400 066. **Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 9869211055

**OFFICE TIME :** 10.00 am to 6.00 p.m.

### COMPUTERISED ACCOUNTS SERVICES

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

**WITH BEST COMPLIMENTS FROM**



**MANGSIDHESH INVESTMENTS PRIVATE LIMITED**

**CORPORATE OFFICE :**
1 A, Saraswati Baug, Near Arvind Gandbhir Jr. School, H.F. Soc. Road,
Jogeshwari (E), Mumbai - 400 060 **Tel.: 2830 3298, 2821 1933**




Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80


Across 4 states and 95 years, our bank has touched many lives.

**95** WALKING THROUGH THE 95 YEARS OF AMITY. SURGING TOWARDS THE CENTENARY.

**65** NETWORK OF 65 BRANCHES ACROSS THE STATES OF MAHARASHTRA, KARNATAKA, GOA & GUJARAT.

| Attractive Loan Schemes | Value Added Services |
|---|---|
| MEDIFINA Loan for Medical Professionals | Foreign Exchange Licensed Money Changer |
| Loan for SME | |
| EDUCATION Loan | Foreign currency Travel Card |
| PROFINA Loan for professionals | Stamp Franking/ RTGS/ NEFT |
| CAR Loan | I-Connect for easy tax payment |
| HOUSING Finance | Demat |
| CONSUMER/ PERSONAL Loan | Life / Non- Life Insurance |

**NKGSB** CO-OP. BANK LTD. (Multi-State Scheduled Bank)

Regd. Office: 361, Laxmi Sadan, V.P. Road, Girgaum, Mumbai - 400 004
Tel.: 6754 5000 email: sec@nkgsb-bank.com www.nkgsb-bank.com


हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.